सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वाजराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्रं 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड 431601


**PRESS NOTE**

दिनांक 08.10.2025.

# शहर वाहतुक शाखेतील पोलीसांनी जखमी इसमास सरकारी वाहनाने तात्काळ दवाख्याण्यात केले दाखल ..

दि.07/10/2025 रोजी दुपारी 13.00 वा चे सुमारास इतवारा शहर वाहतुक शाखा येथील पोलीस निरीक्षक श्री जगन पवार हे सपोनि/श्री राजकुमार हिंगोले व त्यांचे स्टाफसह जुना मोंढा येथे विशेष मोहीम राबवुन मोटार वाहन कायदा अन्वये केसेस करीत असतांना माहीती मिळाली की एक इसम जुना मोंढा ते कौठा ब्रिजवर मोटार सायकल सह रस्त्याच्या कडेला पडलेला आहे अशी माहीती मिळाली.

मिळालेल्या माहीती वरून इतवारा शहर वाहतुक शाखा येथील पोलीस निरीक्षक श्री जगन पवार हे सपोनि/श्री राजकुमार हिंगोले व त्यांचे स्टाफसह सदर ठिकाणी गेले व कुठलाही विचार न करता पोलीस नियंत्रण कक्षास माहीती देवुन सदर इसमास स्टाफचे मदतीने सरकारी वाहणात घेवुन औषधोपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपुरी येथे नेवुन दवाखाण्यात दाखल केले. त्यानंतर सदर इसमाबाबत माहीती काढली असता त्याचे नाव माधव गंगाराम सुनेवाड, रा.बेटमोगरा,ता.मुखेड असे असल्या बाबत माहीती मिळाली वरून सदर जखमी इसमाचे नातेवाईक यांचे बाबत चौकशी केली असता भाउ नामे देवीदास गंगाराम सुनेवाड रा.मुखेड यांचे बाबत माहीती काढुन त्यांना संपर्क करून माधव गंगाराम सुनेवाड, रा.बेटमोगरा,ता.मुखेड हा सरकारी दवाखाना विष्णुपुरी येथे शेरीक असल्या बाबत माहीती दिली. माधव गंगाराम सुनेवाड, रा.बेटमोगरा,ता.मुखेड यांची तबयत सध्या स्थिर आहे. सदर इसमाची मोटर सायकल ही पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे जमा करण्यात आली आहे.

सदर कामगीरी करणारे पोलीस अधिकारी श्री जगन पवार, सपोनि/श्री राजकुमार हिंगोले, पोउपनि/कांबळे,पोलीस अंमलदार/हंकारे,ठाकुर यांचे **मा.श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड** यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड**